# महाराष्ट्र शासन

महत्त्वाचे/तात्काळ
दूरध्वनी ०२२-२२०२ ३१२१
ई मेल—desk११a-gad@mah.gov.in

क्र. प्राविचौ-१४२२/प्र.क्र.६९/११-अ
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
सातवा मजला, दालन क्र.७२५ विस्तार,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दि. १६ डिसेंबर,२०२२

प्रति,

सह सचिव/उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२.

**विषय :- प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत- औरंगाबाद व अमरावती**

महोदया/महोदय,

राज्य सेवेतील **गट-अ** (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-२५ : ७८८०० -२०९२०० पेक्षा खालील वेतनस्तर/असुधारित वेतन संरचनेमधील रु.७६०० पेक्षा कमी ग्रेड वेतन) व **गट-ब** मधील अधिकाऱ्यांविरुध्दच्या शिस्तभंगविषयक प्रकरणांत चौकशीची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी या विभागाच्या आधिपत्याखाली ६ महसुली विभागांकरीता प्रत्येकी एक याप्रमाणे ६ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदे मंत्रालयीन उप सचिव वा समकक्ष अथवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या राज्य शासकीय अधिकाऱ्यांमधून बदलीने भरण्यात येतात.

२. सदर ६ पदांपैकी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, **औरंगाबाद** व प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, **अमरावती** या २ पदांकरीता मंत्रालयीन उप सचिव वा समकक्ष अथवा त्यावरील वेतनश्रेणीतील इतर संवर्गातील राज्य शासकीय अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

३. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद व प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती या पदांवर बदलीने जाण्यास इच्छुक असलेल्या, सातव्या आयोगानुसार एस-२५:७८८००-२०९२०० (असुधारित वेतन संरचनेमधील रु.७६०० ग्रेड वेतन) अथवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनस्तरातील वेतन घेणाऱ्या, आपल्या विभागाच्या अखत्यारीतील अधिकाऱ्यांचे अर्ज सोबतच्या विवरणपत्रातील माहिती/कागदपत्रांसह आणि विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्रासह **दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पर्यंत** या विभागास पाठविण्यात यावेत. तसेच कोणीही अधिकारी इच्छुक नसल्यास तसेही या विभागास कळवावे, ही विनंती.

इच्छुक अधिकाऱ्यांनी आपआपल्या विभागांकडे अर्ज सादर करावेत, परस्पर या विभागाकडे अर्ज करु नयेत. परस्पर अर्ज सादर केल्यास त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२२१२१६१२००२८०२०७ असा आहे.

आपला,

JAYANT ATMARAM VISPUTE

Digitally signed by JAYANT ATMARAM VISPUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=270fdfeec4c895f934c1d67cb0dcb0146d1b1c14a43f6d51261d79bcba36629d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DFC4BCFCF892CC695B8075E8ACA1712B51FE5A2036D1A368994EB4CC5580B1B1, cn=JAYANT ATMARAM VISPUTE
Date: 2022.12.16 12:05:03 +05'30'

**( ज.आ.विसपुते)**

**शासनाचे अवर सचिव**

**सोबत-विवरणपत्र**

**प्रत :-**

सह सचिव (कार्यासन-१४) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी.

कार्यासन ११अ संग्रहार्थ

**( क्र.प्राविचौ-१४२२/प्र.क्र.६९/११-अ, दि.१६ डिसेंबर,२०२२ सोबतचे विवरणपत्र )**

**प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी पदावर बदलीने नियुक्तीकरीता इच्छुक अधिकाऱ्याची माहिती/तपशील (संबंधित कागदपत्रांसह)**

१. अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव:-
२. पदनाम/सेवार्थ क्रमांक :-
३. विभाग/कार्यालय:-
४. वेतन श्रेणी:-
५. शैक्षणिक अर्हता:-
६. स्थायित्व प्रमाणपत्र:-
७. जन्मदिनांक:-
८. सेवेत आल्याचा दिनांक:-
९. सेवानिवृत्तीचा दिनांक:-
१०. भ्रमणध्वनी क्रमांक:-
११. ई-मेल आयडी:-
१२. मत्ता व दायित्व विवरणपत्रे सादर केली आहेत का :-
१३. ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का (लागू असल्यास) :-
१४. यापूर्वी चौकशी अधिकारी म्हणून काम केले आहे काय ?
१५. संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक प्रकरण सुरु आहे किंवा कसे ?
१६. विभागीय चौकशी/न्यायिक प्रकरणात शिक्षा झाली होती का ?
१७. इच्छुक अधिकाऱ्याची निवड झाल्यास बदलीच्या पदावर कार्यमुक्त करण्यास विभाग तयार असेल का ?
१८. मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.

**स्वाक्षरी /-**

**आस्थापना अधिकाऱ्याचे नाव व पदनाम**